पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/४/कावि/४११/२०१५
दिनांक - २२/०५/२०१५

प्रति,

मा........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक- २६/०५/२०१५ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २६/०५/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक- १७१**

दिनांक- २६/०५/२०१५ वेळ- सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २६/०५/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक १९/०५/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७०) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्रमांक-१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत असलेल्या १८ माध्यमिक विद्यालये, क्रिडा प्रबोधिनी मुलांचे वसतीगृह व शिक्षण मंडळाकडील १३४ प्राथमिक शाळांची स्वच्छता करणेकामाची माध्यमिक शिक्षण विभागामार्फत ई-निविदा प्रसिध्द करुनपात्र निविदाधारकांची खाली नमुद केलेप्रमाणे नेमणुक करण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रभागाचे नाव(जुने) | नेमण्यात आलेल्या एजन्सीचे नाव | मा.स्थायी समिती ठराव क्रमांक व दिनांक | कामाचा मासिक दर/ खर्च र.रु. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ | मे.बी.एस.ए.कार्पोरेशन लि. | ४२६४,दि.९/१०/२०१३ | ५,१५,०००/- | दि.१/१२/२०१३ ते दि.३०/११/२०१४ |
| २ | ब | मे.बी.एस.ए.कार्पोरेशन लि. | ४२६६,दि.९/१०/२०१३ | ४,४८,७१५/- | दि.१/१२/२०१३ ते दि.३०/११/२०१४ |
| ३ | क | मे.डी.एम.एंटरप्रायझेस | ४२६७,दि.९/१०/२०१३ | ५,१५,०००/- | दि.१/१२/२०१३ ते दि.३०/११/२०१४ |
| ४ | ड | मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि. | ४३७८,दि.१७/१०/२०१३ | ४,६४,२५९/- | दि.१/१२/२०१३ ते दि.३०/११/२०१४ |

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सदर ठेकेदारांची मुदत दि.३०/११/२०१४ रोजी संपतआहे. उपरोक्त मा.स्थायी समिती मंजूर ठरावानुसार सदरचे कामास पुढील १ वर्षाकरीता मुदतवाढ देता येईल अशी तरतुद आहे. त्यानुसार सदरचे ठेकेदारांचे कामास दिनांक ०१/१२/२०१४ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेस, याकामी त्यांचेशी करारनामा करणेस व किमान वेतन दरामध्ये शासनाकडून होणा-या वाढीनुसार येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक २६/०५/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक-२) नागरवस्ती विभागाकडील अपंग कल्याणकारी योजना क्र.३ मधील अपंगांकरीता चलन वलन साधने खरेदी करणेकामी प्रसिध्द करणेत आलेली ई-निविदा क्र.२२/२०१४-१५ मधील बाब क्र.२ व ३ अनुक्रमे तीन चाकी सायकल व व्हिल चेअर या बाबी वगळता तातडीची बाब असलेने फक्त श्रवणयंत्रे खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या निविदाधारकांपैकी लघुत्तम निविदाधारक मे.प्राईम सर्जिकल अँन्ड फार्मा

यांचे निविदेतील लघुत्तम दर र.रु.१३,४००/- यानुसार २५ नगांकरीता येणाऱ्या एकूण र.रु. ३,३५,०००/- या रकमेस करारनामा करुन खरेदी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०५/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक-३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. स्थापत्य/अ मुख्यालय/HO/४४/२/ २०१४-१५ अन्वये, प्र.क्र.१७ मध्ये अंतर्गत पाथवे पेव्हींग ब्लॉक पध्दतीने करणे (से.क्र.२६, २७, २७अ व २८) कामी M/S. VYANKATESHWARA CONSTRUCTION (नि.र.रु.३६,४१,३०३/- (अक्षरी र.रू.छत्तीस लाख एकेचाळीस हजार तीनशे तीन) पेक्षा ३६.३६ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.२४,३३,१९१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०५/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक-४) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. स्थापत्य/अ मुख्यालय/HO/४४/६/ २०१४-१५ अन्वये, प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील से.क्र.२७ मधील पेव्हींग ब्लॉकची दुरुस्तीची व अनुषंगिक कामे करणेकामी मे.व्यंकटेश्वरा कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.४२,०१,६७२/- (अक्षरी र.रू.बेचाळीस लाख एक हजार सहाशे बहात्तर) पेक्षा ३६.३६ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.२८,०७,६४१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०५/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक-५) वैद्यकीय विभागाकडील निविदा क्र.१०/२०१४-१५ मधील लघुत्तम निविदाधारक मे.फार्मे डिल यांचे प्राप्त लघुत्तम दर सर्व करासहित र.रु.२२,००,०००/- या दराने वाय.सी.एम. रुग्णालयातील एक्स रे विभागासाठी आवश्यक अत्याधुनिक डिजीटल सोनोग्राफी मशिन खरेदी करणेकामी येणाऱ्या र.रु.२२,००,०००/- (अक्षरी र.रु.बावीस लाख फक्त) चे खर्चास तसेच सदरचा खर्च वैद्यकीय विभागाकडील उपकरणे खरेदी या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०५/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक-६) मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.क्र.५/१८/२०१४-१५ अन्वये ब परिसरातील वार्षिकी ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबर्सची दुरूस्ती करणेकामी मे.विजय व्ही साळुंखे (नि.र.रू.४५,३४,७८२/- (अक्षरी र.रू.पंचेचाळीस लाख चौतीस हजार सातशे ब्याऐंशी फक्त) पेक्षा २८.१० % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेवून ठराव क्र.१०१५९ विषय क्र.६३ दि.३०/१२/२०१४ अन्वये यापुर्वी स्थायी समिती मार्फत मान्यता दिलेली आहे. सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ४७९

दि.२०/०५/२०१४ अन्वये र.रू.५०,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. तथापी सदर परिसरात सध्या व नव्याने उद्भवणारी जलनिःसारण नलिकेची व चेंबरची तातडीने दुरूस्ती करणे, आवश्यक असल्याने तसेच नव्याने देखभाल दुरूस्तीचे काम लवकर उपलब्ध होणार नसल्याने पुढील चार महिने कालावधीसाठी सध्याचे चालु कामा मधुनच काम करणे आवश्यक आहे यासाठी सदर काम निविदा रकमेपर्यंत (र.रू.४५,३४,७८२/-) करून घेणेचा प्रस्ताव आहे. त्याची सुधारित रक्कम रूपये ६३,०६,०००/- वाढीव र.रू.१३,०६,०००/- इतकी येत आहे. तरी ठेकेदाराकडुन मंजूर दराने सुधारीत काम करून घेणेस तसेच नियमानुसार निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०५/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक-७) मनपा क क्षेत्रीय आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१५-१६ अन्वये, क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील नाले खरडून साफ करणे व त्यातून निघालेला गाळ, कचरा, राडारोडा वाहतूक करून मोशी कचरा डेपोत खाली करून पसरून देणेकामी मे.जनसेवा स्वयंरोजगार सेवा सह. संस्था, श्री.राजु अशोक साठे (नि.र.रू.६,०४,६८३/- (अक्षरी र.रू.सहा लाख चार हजार सहाशे त्र्याऐंशी) पेक्षा ३४.९९ % कमी) या ठेकेदाराशी करारनामा करून कामाचा आदेश देण्यात येणार असल्याने क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील नाले साफ करणे व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०५/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक-८) कॉलेज ऑफ फिजीशियन अँण्ड सर्जन, मुंबई (सी.पी.एस.) या अभिमत विद्यापीठाच्या ११ वैद्यकीय शाखांच्या M.B.B.S. नंतरच्या सी.पी.एस. डिप्लोमा कोर्सेसकरीता आवश्यक असणा-या मुख्य पी.जी.टिचर्स व असिस्टंट पी.जी.टिचर्स करीता प्रस्तावात नमुद यादीतील डॉक्टरांची मानसेवी पदावर र.रु.५,०००/- (अक्षरी र.रू.पाच हजार) प्रति महीना दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०९/२०१५ या सहा महिने कालावधीसाठी नेमणुक करणेकामी व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०५/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक-९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील फेरीवाल्यांचे बायोमेट्रीक पध्दतीने सर्व्हेक्षण करणेबाबत ई-गर्व्हेनस विभागाकडील निविदा सुचना क्र.९/२०१४-१५ अन्वये निविदा प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदेमध्ये मे.जनसेवा स्वयं सेवा सह. संस्था यांनी (नि.र.रू.३८,६४,०००/- (अक्षरी र.रू.अडोतीस लाख चौसष्ट हजार) पेक्षा २.२६ % ने जास्त) (र.रु.३९,५१,४५१/-) या मंजुर दराने काम करुन घेणेस व नियमानुसार व निविदेतील अटी व शर्ती अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०५/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक-१०) मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२/२०१४-२०१५ अन्वये फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्ट्रॉम वॉटर चेंबर्स गटर्स सफाई करणे व निघणारा गाळ

कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ. वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरवून देणेकामी मे.संत गाडगेबाबा स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. (निविदा र.रू.४,५०,०१८/- (अक्षरी र.रु. चार लाख पन्नास हजार अठरा फक्त) प्र.क्र. १, २, ३, ४, ५, ९, ११, १२, १३ व २८ मधील स्ट्रॉम वॉटर चेंबर्स गटर्स सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ. वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरवून देणे याप्रमाणे ठेकेदारा बरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्यांचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक-११) मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/१/२०१४-२०१५ अन्वये फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील नाले साफ सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ. वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरवुन देणेकामी मे.एम.जी.मंगळवेढेकर (निविदा र.रू. ३,७४,६४८/- (अक्षरी र.रु. तीन लाख चौ-याहत्तर हजार सहाशे अठ्ठेचाळीस फक्त) प्र.क्र.२, ४, ५, ९, १३ व २८ मधील नाले साफ सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ.वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरुवुन देणे याप्रमाणे ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्यांचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक-१२) पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्यादित, पुणे यांचेकडील पत्र क्र. प्रशासन/मु.कं./१४२ दि.२२/४/२०१५ अन्वये पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्यादित, चिखली शाखा यांचे वापरातील मौजे चिखली येथील महानगरपालिका शाळा इमारतीमधील गाळा क्र.३, ४, ५ व ६ (तळमजला) ११ महिने कालावधीसाठी भाडेकरार करणेकामी विनंती केलेली आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्यादित, पुणे, मुख्य कचेरी, ४ ब, बी.जे. रोड, पुणे-४११ ००१. यांना उपसंचालक, नगररचना व विकास विभाग यांनी ठरवुन दिलेल्या प्रतिमहा भाडे दर र.रु.२४/- प्रती चौ.फुट नुसार एकुण ९३६ चौरस फुटांचे ११ महिन्यांचे भाडे र.रु.२,४७,१०४/-, सेवाकर (१२.३६ %) र.रु.३०,५४२/- व चार महिन्यांचे भाडे रक्कम अनामत र.रु.८९,८५६/- असे एकूण र.रु.३,६७,५०२/- मनपा कोषागारात भरल्यानंतर करारनामा करुन पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्यादित, चिखली शाखेचे वापरासाठी मौजे चिखली येथील महानगरपालिका शाळा इमारतीमधील गाळा क्र.३,४,५ व ६ (तळमजला) माहे एप्रिल २०१५ पासून ११ महिन्याकरिता भाडयाने देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-१३) मनपा गणवेश देय पुरूष व महिला कर्मचा-यांकरीता गणवेश खरेदीकामी प्राप्त कापड नमुन्यांची तांत्रीक तपासणी मान्यता प्राप्त लॅब कडून करून घेणेकामी आलेल्या र.रू. २९,८२०/- (अक्षरी र.रू.एकोणतीस हजार आठशे वीस) चे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-१४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत पवनाथडी जत्रा २०१३-१४ हा उपक्रम राबॅवणेकामी सन २०१३-१४ या वर्षाकरिता नगारवस्ती विकास योजना विभागास मा.स्थायी समिती ठराव क्र ४२२९ दिनांक ०१/१०/२०१३ अन्वये रक्कम रुपये ४०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चाळीस लाख रुपये फक्त) पर्यंतच्या खर्चास मान्यता देणेत आलेली होती. नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत सन २०१३-२०१४ करीता पवनाथडी जत्रेचे आयोजन केले

असता नागरवस्ती विकास योजना विभागाकडील सन २०१३-२०१४ पवनाथडी जत्रासाठी केलेली तरतूद संपलेली असल्याने सन २०१३-२०१४ कालावधीतील बील अदा करणे आवश्यक आहे. त्याअन्वये पवनाथडी **जत्रा २०१४** कालावधीतल बील रक्कम रुपये ८४,२१४/- (अक्षरी रक्कम रुपये चौं-याऐंशी हजार दोनशे चौदा फक्त) नागरवस्ती विकास योजना विभागाकडील पवनाथडी जत्रासाठी केलेल्या तरतूदीतून खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-१५) मे.औद्योगिक न्यायालय पुणे येथे ULP NO-3/2012, 4/2012, 5/2012, 7/2012 8/2012, 128/2011, 262/2010, 259/2010, 257/2010, 28/2012, 19/2011, 261/2010 या प्रकरणी मे.औद्योगिक न्यायालय यांनी निकाल दिला आहे. सदर प्रकरणी अँड.जयंत शाळीग्राम काम पहात असुन त्यांनी वकील फी र.रु.४४,०००/- मागणी केली आहे. अँड.जयंत शाळीग्राम यांना वकील फी र.रु.४४,०००/- वजा १०% आयकर र.रु.४,४००/- निव्वळ देय र.रु.३९,६००/- (अक्षरी र.रू.एकोणचाळीस हजार सहाशे) अदा करावयाची असल्याने होणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-१६) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणाहून शहरांचे विविध ठिकाणी मोठया प्रमाणात वाहनांची रोज ये-जा अहोरात्र चालू असते. त्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील विविध (सिग्नल असलेले व सिग्नल नसलेले) व जास्त वर्दळीचे चौक येथील रहदारी सुरळीतपणे चालू रहाणेसाठी वाहतूक पोलीसांचे मदतीकरीता ठेकेदारी पध्दतीने १ (एक) वर्षकालावधीसाठी अंदाजे १०० ट्रॅफिक वार्डन (पुरुष) कर्मचा-यांची नियुक्ती करीता मान्यता प्राप्त इच्छुक निविदाकारांकडून ई-निविदा सुचना क्र.१/२०१४-२०१५ प्रसिध्द केली असता निविदेतील अटी शर्तीनुसार ई-निविदे अंतर्गत ५ (पाच) संस्था/एजन्सी/ठेकेदार यांनी निविदेत सहभाग नोंदविलेल्या संस्थाना मा.अति.आयुक्त यांच्या मान्य प्रस्तावा अन्वये सर्व संस्थाना पात्र करणेत आल्याने पाकिट क्र.२ दिनांक १६/१२/२०१४ रोजी उघणेत आलेले आहेत. त्याअन्वये मा.आयुक्त यांनी आयुक्त कार्यालय येथे बैठक आयोजित करणेत आली. या बैठकीमध्ये विभागून दिल्या अन्वये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तक्त्यान्वये सर्व संस्था/एजन्सी/ठेकेदार यांना मा.आयुक्त यांचे सुचनेनुसार सुरक्षा विभागाच्या सोईच्या दृष्टीने ज्या संस्थांनी ज्या निविदेमध्ये भाग घेतला आहे त्याअन्वये व सुरक्षा विभाग कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने पात्र संस्थाना दिनांक २/०३/२०१५ रोजीच्या पत्राअन्व्ये मा.सहा.आयुक्त कामगार कल्याण यांनी कळविणेत आलेल्या रखवालदार मदतनीस कर्मचारी यांच्या दर रक्कम रुपये १२१११६.३३ प्रमाणे कामकाज करणेस तयार आहेत किंवा नाही याबाबत विचारणा केली असता सर्व संस्थेचे मालक/प्रतिनिधी यांनी रक्कम रुपये १२१११६.३३ प्रमाणे कामकाज करणेस तयार आहोत व आमची कुठलेही तक्रार नाही असे कळविणेत आले. वरिल सर्व बाबीचे अवलोकन करता उपरोक्त पात्र संस्थाना वाहतूक पोलिसांच्या मदती करता त्यांच्या वेळे नुसार सकाळी ९.०० ते दुपारी १.०० व सायंकाळी ४.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत तैनात करणेचे कामकाज १२ महिने कालावधीकरीता मा.सहा.आयुक्त कामगार कल्याण यांनी कळविणेत आलेल्या रखवालदार मदतनीस कर्मचारी यांच्या दर दर रक्कम रुपये १२१११६.३३ हे ट्रॅफिक वार्डन यांना लागू करुन कर्मचारी पुरविणे बाबत कामकाज आदेश देणे कामी खालिल तक्त्यात नमुद केले प्रमाणे मान्यता असावी.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मासिक दर | संख्या |
| --- | --- | --- | --- |
| १ | मे.एल.एम.सी. सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. | १२११६.३३ | ७५ |
| २ | मे.श्रीकृपा सर्व्हीसेस | | २५ |
| | | एकूण | १०० |

वर दर्शविलेल्या तक्त्यानुसार उपरोक्त संस्थेकडून ट्रॅफिक वार्डन कर्मचारी पुरविणे कामी प्रती माह प्रती ट्रॅफिक वार्डन कर्मचारी रक्कम रुपये **१२११६.३३** प्रमाणे येणा-या खर्चास व ईनिविदेतील अटी-शर्ती प्रमाणे मुळ वेतन व जानेवारी व जुलै मध्ये वेळोवेळी लागू होणारा महागाई भत्ता व इतर भत्ते लागू करणेस व त्या पोटी  होणा-या खर्चास मान्यता देणे, तसेच ट्रॅफिक वार्डन कर्मचारी गैरहजर असल्यास त्यांचे मासिक वेतनास महिन्याचे २६ दिवसांनी भागून येणा-या प्रति दिन दराने गैरहजर दिवसांचे वेतन कपात करणेस, झोपलेल्या ट्रॅफिक वार्डन कर्मचा-यांचे बाबत प्रति कर्मचारी प्रति दिन र.रू.१००/- प्रमाणे दंड वसूल करणेस, व गणवेश परिधान न केलेल्या ट्रॅफिक वार्डन कर्मचा-यांचे बाबत प्रति कर्मचारी प्रति दिन र.रू.५०/- नुसार दंड वसुल करणेस व ठेकेदारी पध्दतीने नेमलेल्या गैरहजर ट्रॅफिक वार्डन कर्मचा-याच्या वेतनावर (पाच टक्के) ५% दंड अकारणेस तसेच या नविन निविदेमध्ये रखवादलदार मदतनीस कर्मचा-यांचे गैरहजेरीचे प्रमाण कमी होण्याचे दृष्टीने दंडात्मक कार्यवाही म्हणून ठेकेदाराला रक्कम रुपये २०००/- प्रति महा जादा दंड आकारुन येणा-या व एकूण गैरहजरीच्या रक्कमेवर ५ % अतिरिक्त दंड अकारणेत यावा व सदरचा खर्च हा सुरक्षा विभागाकडील **''सामाजिक सुरक्षितता उपक्रम''** या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेत यावा व संबंधितांबरोबर ०१ वर्षाचा करारनामा करुन कामाचा आदेश देणेस तसेच येणा-या प्रशासकीय खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-१७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागामार्फत मनपाच्या विविध मिळकती/उदा. करसंकलन विभागीय कार्यालय, पाणी पुरवठा,कार्यशाळा इ.ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेचे काम ठेकेदारी पध्दतीने १ (एक) वर्षकालावधीसाठी ३७१ रखवालदार मदतनीस कर्मचा-यांची नियुक्तीकरीता मान्यता प्राप्त इच्छुक निविदाकारांकडून ई-निविदा सुचना क्र.२/२०१४-२०१५ प्रसिध्द केली असतानिविदेतील अटी शर्तीनुसार ई-निविदे अंतर्गत अनुक्रमे ०९ (नऊ) संस्था/एजन्सी/ठेकेदार यांनी निविदेत सहभाग नोंदविलेल्या संस्थाना मा.अति.आयुक्त यांच्या मान्य प्रस्तावा अन्वये सर्व संस्थाना पात्र करणेत आल्याने पाकिट क्र ०२ दिनांक ०१/०१/२०१५ रोजीउघणेत आलेले आहेत. त्याअन्वये मा.आयुक्त यांनी दिनांक आयुक्त कार्यालय येथे बैठक आयोजित करणेत आली.या बैठकीमध्ये विभागून दिलेल्या तक्त्यान्वये सर्व संस्था/एजन्सी/ठेकेदार यांना सुरक्षा विभागाच्या सोईच्या दृष्टीने ज्या संस्थांनी निविदेमध्ये भाग घेतला आहे त्याअन्वये व सुरक्षा विभाग कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने खालिल तत्क्यात नमुद केलेप्रमाणेई-निविदा सुचना क्र.२/२०१४-१५ मध्ये रखवालदार मदतनीस कर्मचारी (अर्ध कुशल कामगार) यांची नेमणूक करणेस मान्यता द्यावी.

| अ.क्र | संस्था/एजन्सी/ठेकेदार नाव | ई-निविदा सुचना क्र.२/२०१४-१५ एल १ दरपत्रक | रखवालदार मदतनीस कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|
| १) | मे.श्रीकृपा सर्व्हीसेस प्रा.लि. | १११२४.९९ | ३६ |
| २) | **मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि** | | १२० |
| ३) | मे.शुभम उदयोग | | ८५ |
| ४) | **मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि.** | | ७५ |
| ५) | **मे.क्रिस्टल इंट्रिगेटेड सर्व्हिसेस प्रा.लि.** | | ५५ |
| | एकूण | | ३७१ |

वर दर्शविलेल्या तक्त्या अन्वये व ईनिविदेतील अटी-शर्ती नुसार मुळ वेतन व वेळोवेळी लागू होणारा महागाई भत्ता व इतर भत्ते लागू करणेस तसेच उपरोक्त संस्थेच्या नावापुढे नमुद केले प्रमाणे रखवादलदार मदतनीस कर्मचारी पुरविणे कामी दर प्रती माह प्रती रखवालदार रक्कम रुपये **१११२४.९९** प्रमाणे संबधित कोणताही महिना असला तरी २६ दिवसांनी भागून येणा-या रक्कमे नुसार रखवालदार मदतनीस कर्मचारी (अर्ध कुशल कामगार) गैरहजर असलेस त्यांचे मासीक दरानुसार प्रति दिन येणा-या दरानुसार गैरहजर दिवसांचे वेतन कपात करणेस,तसेच झोपलेल्या रखवादलदार मदतनीस कर्मचारी आढळून आल्यासयांचे बाबत प्रति कर्मचारी प्रति दिन र.रू.१००/- व गणवेष परिधान न केलेल्या रखवादलदार मदतनीस कर्मचारीयांचे बाबत प्रति कर्मचारी प्रति दिन र.रू.५०/- नुसार दंड अकारणेस तसेच या नविन निविदेमध्येरखवादलदार मदतनीस कर्मचा-यांचे गैरहजेरीचे प्रमाण कमी होण्याचे दृष्टीने दंडात्मक कार्यवाही म्हणून ठेकेदाराला रक्कम रुपये २०००/- प्रति महा जादा दंड अकारुन येणा-या व एकूण गैरहजरीच्या रक्कमेवर ५% अतिरिक्त दंड अकारणेत यावा तसेच सदरचा खर्च हा सुरक्षा विभागाकडील **''ठेकेदारी पध्दतीने सुरक्षा व्यवस्था''** या लेखाशिर्षावरुन खर्ची टाकणेत यावा. संबंधितांबरोबर ०१ वर्षाचा करारनामा करुन कामाचा आदेश देणेकामी व तसेच येणा-या प्रशासकीय खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-१८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय शाळेच्या सुरक्षा व्यवस्थेचे कामकाज करणे कामी ठेकेदारी पध्दतीने १ (एक) वर्षकालावधीसाठी अंदाजे २९४ रखवालदार मदतनीस कर्मचा-यांची नियुक्तीकरीता मान्यता प्राप्त इच्छुक निविदाकारांकडून ई-निविदा सुचना क्र.३/२०१४-२०१५ प्रसिध्द केली असता निविदेतील अटी शर्तीनुसार ई-निविदे अंतर्गत ८ (आठ) संस्था/एजन्सी/ठेकेदार यांनी निविदेत सहभाग नोंदविलेल्या संस्थाना मा.अति.आयुक्त यांच्या मान्य प्रस्तावा अन्वये सर्व संस्थाना पात्र करणेत आल्याने पाकिट क्र २ दिनांक ०१/०१/२०१५ रोजी उघणेत आलेले आहेत. त्याअन्वये मा.आयुक्त यांनी आयुक्त कार्यालय येथे वाजता बैठक आयोजित करणेत आली.या बैठकीमध्ये विभागून दिलेल्या तक्त्यान्वये सर्व संस्था/एजन्सी/ठेकेदार यांना सुरक्षा विभागाच्या सोईच्या दृष्टीने ज्या संस्थांनी निविदेमध्ये भाग घेतला आहे त्याअन्वये व सुरक्षा विभाग कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने खालिल तत्क्यात नमुद केलेप्रमाणेई-निविदा सुचना क्र.३/२०१४-१५ मध्ये रखवालदार मदतनीस कर्मचारी (अर्ध कुशल कामगार) यांची नेमणूक करणे एल

१च्या दर सेवाकर वगळता (गृहीत न धरता) प्रती माह प्रती रखवादलदार मदतनीस कर्मचारी रक्कम रुपये **१०,८००/-** मध्ये काम करणेस तयार आहेत किंवा नाहीत याबाबत विचारणा केली असता सर्व संस्था एल १ च्या दर प्रती माह प्रती रखवालदार मदतनीस कर्मचारी रक्कम रुपये **१०,८००/-** मध्ये काम करणेस तयार आहोत व आमची कुठलेही तक्रार नाही असे कळविणेत आले. वरिल सर्व बाबीचे अवलोकन करता पात्र संस्थाना शाळेवरील सुरक्षा व्यवस्था करणे कामी बैठकीमध्ये विभागून दिलेल्या तक्त्यान्वये सर्व संस्था/एजन्सी/ठेकेदार यांना सुरक्षा विभागाच्या सोईच्या दृष्टीने ज्या संस्थांनी ज्या निविदेमध्ये भाग घेतला आहे त्याअन्वये व सुरक्षा विभागाच्या कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने खालिल तत्क्यात नमुद केलेप्रमाणेई-निविदा सुचना क्र.३/२०१४-१५ मध्ये रखवालदार मदतनीस कर्मचारी (अर्ध कुशल कामगार) यांची नेमणूक करणेस मान्यता द्यावी.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | सेवाकर वगळता मासिक दर | संख्या |
|---|---|---|---|
| १ | मे.एल.एम.सी. सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. | **१०,८००/-** | ८५ |
| २ | मे.श्रीकृपा सर्व्हीसेस | | ९९ |
| ३ | मे.सैनिक इंटेलिजन्स सर्व्हीसेस प्रा.लि. | | ५५ |
| ४ | मे.बी.व्ही.जी इंडिया | | ५५ |
| एकूण | | | २९४ |

वर नमुद केलेल्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ईनिविदेतील अटी-शर्ती प्रमाणे मुळ वेतन व वेळोवेळी लागू होणारा महागाई भत्ता व इतर भत्ते लागू करणेस व त्या पोटी होणा-या खर्चास मान्यता देणे तसेच सुरक्षा रक्षक गैरहजर असलेस त्यांचे मासीक दरानुसार प्रति दिन येणा-या दरानुसार गैरहजर दिवसांचे वेतन,झोपलेल्या सुरक्षा रक्षक, यांचे बाबत प्रति कर्मचारी प्रति दिन र.रू.१००/-व गणवेष परिधान न केलेल्या सुरक्षा रक्षक,यांचे बाबत प्रति कर्मचारी प्रति दिन र.रू.५०/- नुसार दंड कामकाज आदेश दिलेपासून वसूल करणेस तसेच या नविन निविदेमध्येरखवादलदार मदतनीस कर्मचा-यांचे गैरहजेरीचे प्रमाण कमी होण्याचे दृष्टीने दंडात्मक कार्यवाही म्हणून ठेकेदाराला रक्कम रुपये २०००/- प्रति महा जादा दंड अकारुन येणा-यागैरहजेरीचे प्रमाण कमी होणेचे दृष्टिने गैरहजर दिवसांचे वेतनावर ५%टक्के अतिरिक्त दंड आकारणेकामी तसेच सदरचा खर्च हा सुरक्षा विभागाकडील **''ठेकेदारी पध्दतीने सुरक्षा व्यवस्था''** या लेखाशिर्षावरुन खर्ची टाकणेत यावा. संबंधितांबरोबर ०१ वर्षाचा करारनामा करुन कामाचा आदेश देणेकामी व तसेच येणा-या प्रशासकीय खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-१९) दि.१०/०४/२०१५ व दि.२३/०४/२०१५ रोजी विविध कार्यक्रमाच्या अनुशंगाने विविध मान्यवरांनी महापालिकेस भेट दिली. त्यावेळी सदर मान्यवरांची भोजन व्यवस्था हॉटेल सिट्रस, पिंपरी येथे करणेत आली होती. त्यासाठी र.रू.९,२४७/- (अक्षरी र.रु. नऊ हजार दोनशे सत्तेचाळीस फक्त) इतका खर्च भोजन व्यवस्थेवर झालेला आहे. सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-२०) मनपाचे मध्यवर्ती औषध भांडार विभागाकडील झेरॉक्स मशीन दुरुस्त करणे कामी आवश्यक असलेले स्पेअरपार्ट साहित्य (एकूण ५ बाबी) खरेदी करुन दुरुस्ती करणेकामी कोटेशन नोटीस क्र.५४/२०१४-१५ अन्वये मनपा वेबसाईटवर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन सिल बंद लिफाप्यात कोटेशन दर मागविण्यात आले होते. त्यानुसार सिलबंद लिफाप्यात तीन दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.फोनिक्स बिजनेस मशीन, यांचे आवश्यक झेरॉक्स मशीन दुरुस्तीचे बाब क्र.१ ते ०५ साहित्याचे र.रु.२५,९४६/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २.६६ % ने कमी आहे. मे.फोनिक्स बिजनेस मशीन, पुणे. यांचे आवश्यक झेरॉक्स मशीन दुरुस्ती करणेकामी एकूण र.रु.२५,९४६/- दर स्विकृत करण्यास मा.सह आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणे.

विषय क्रमांक-२१) मनपाचे स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५०/४/२०१४-१५ अन्वये प्रभाग क्र.४६ येथे स.नं.८८ ज्योतीबा उद्यानासाठी नदीचे कडेने फेरो क्रेट फेन्सींग करणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२८,००,८०५/- (अक्षरी र.रु.अठ्ठावीस लाख आठशे पाच फक्त) पेक्षा २७.२७% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२१,३८,८७७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २२) मनपा उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.८/२०१४-१५ मधील बाब क्र.१ अन्वये क, ड, ई क्षेत्रीय कार्यालयांतर्गत उद्यान विभागासाठी लोखंडी बेंचेस पुरविणे व बसविणे कामी मे.अथर्व स्वयंरोजगार औद्योगिक सेवा एस.एस.मर्यादित निविदा र.रु.९,६१,४००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख एकसष्ट हजार चारशे फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११ टक्के कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून त्यांचेशी करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक २३) यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयाकरिता आवश्यक असलेली प्रस्तावात प्रपत्र अ मध्ये नमूद केलेली पदे ही एकत्रित मानधनावर ६ महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात भरावी लागणार आहेत आणि सदर पदांना प्रस्तावात प्रपत्र ब मध्ये नमूद केलेल्या अनुभवाप्रमाणे दरमहा एकत्रित मानधन रक्कम अदा करणेस यापूर्वी मान्यता मिळालेली आहे. यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामधील एकत्रित मानधनावर भरण्यात येणारी हाऊसमन रजिस्टार, डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदांची परीक्षा यापुढे प्रशासन विभागाने घ्यावी असे मा.आयुक्त सो.यांनी दि.०७/०८/२०१४ रोजी शेरांकन केलेले आहे. त्याप्रमाणे १) त्यानुसार प्रशासन विभागाकडून सदर पदांची परीक्षा घेऊन निवड यादी तयार करून मिळणेस मान्यता मिळावी, तसेच २) वायसीएम रुग्णालयात आवश्यक असणा-या प्रस्तावात नमूद पदांची जाहीरात देऊन भरणेस मान्यता मिळावी. ३) जाहीरातीद्वारे पुर्ण क्षमतेने सदर पदांना उमेदवार न

मिळाल्यास त्यासाठी पुढील ६ महिन्यात दर सोमवारी Walk in interview ने पदे भरण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २४) यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयाकरीता आवश्यक असलेली प्रस्तावात प्रपत्र अ मध्ये नमूद केलेली कान, नाक, घसा सर्जन ही दोन्ही पदे मानधनावर ६ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर भरणेस, तसेच सदर पदे वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवून भरणेस आणि सदर पदांना प्रस्तावात प्रपत्र ब मध्ये नमूद केलेल्या अनुभवाप्रमाणे दरमहा एकत्रित मानधन रक्कम अदा करणेस आणि प्रस्तावात नमूद प्रपत्र अ मधील पदाकरीता उमेदवार न मिळाल्यास सदर पदे भरेपर्यंत दर सोमवारी Walk in interview ने पदे भरण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २५) खालील नमुद केलेल्या अ.क्र.१ व २ कर्मचा-यांना त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या एकत्रित मानधन रकमेवर दि.०९/०६/२०१५ रोजी एक दिवस सेवाखंड देऊन दि.१०/०६/२०१५ ते ०९/१२/२०१५ पर्यंत ०६ महिने कालावधीकरीता हंगामी नियुक्ती देणेबाबत विचार करणे.

| अ.क्र. | नाव | पदनाम | मानधन र.रु. |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती.गलांडे पुनम भानुदास | मानधन निदेशक | १७,०००/- |
| २ | श्री.घसिंग जनार्दन विठ्ठलराव | मानधन निदेशक | १७,०००/- |

विषय क्रमांक २६) खालील नमुद केलेल्या अ.क्र.१ ते ९ कर्मचा-यांना मा.उच्च न्यायालय यांच्या आदेशास अधीन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दि.२१/०५/२०१५ रोजी एक दिवस सेवाखंड देऊन दि.२२/०५/२०१५ ते २१/११/२०१५ पर्यंत ०६ महिने कालावधीकरीता र.रु.१७,०००/- एकत्रित मानधनावर हंगामी नियुक्ती देणेबाबत विचार करणे.

प्रपत्र "अ"

| अ.क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीम. सातकर उज्वला लक्ष्मण | मानधन निदेशक |
| २ | श्री. काळोखे विक्रमसिंह वसंत | मानधन निदेशक |
| ३ | श्री. लांडगे निलेश खुशालचंद | मानधन निदेशक |
| ४ | श्री. दुधाळ भानुदास धर्माजी | मानधन निदेशक |
| ५ | श्रीमती. बोरसे वृंदावनी बन्सीलाल | मानधन निदेशक |
| ६ | श्री. ताठे शहाजी पांडूरंग | मानधन निदेशक |
| ७ | श्री. शिंदे प्रकाश शिवाजी | मानधन निदेशक |
| ८ | श्रीमती. जाधव सीमा यशवंत | मानधन निदेशक |
| ९ | श्री. गावडे किसन दत्तात्रय | मानधन निदेशक |

विषय क्रमांक २७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमधील कॉरीडॉर, अंतर्गत व बाहय परिसराची यांत्रिक पध्दतीने तसेच मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणे या कामासाठी आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत ई-निविदा नोटीस क्र.९/२०१४ – १५ प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ४

निविदाधाराकांपैकी पात्र ३ निविदाधारक १) मे.सुमित फॅसिलिटीज प्रा.लि., २) मे.ब्रिक्स इंडिया प्रा.लि., ३) मे.बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि. यांनी सादर केलेल्या दरपत्रकामध्ये मे.बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि. यांनी सदर कामासाठी सादर केलेला र.रु.४०,८०,०००/- हा दर निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा (र.रु.४४,३५,०००/-) ८% इतका सर्वात कमी सादर केला आहे. सदरचे लघुत्तम दराने मे.बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि. यांची मनपा मुख्य इमारतीमधील कॉरीडॉर, अंतर्गत व बाहय परिसराची यांत्रिक पध्दतीने तसेच मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणेकामी १ वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणे, याकामी त्यांचेशी आवश्यक अटी/शर्तीचा करारनामा करणे, कामाचे आदेश देणे व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यात देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २८) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन A-7, मिलिंदनगर पुनर्वसन प्रकल्पातील A-2 इमारतीकरीता MPCB कडून Consent to Operate मिळणेसाठी र.रु.३०,०००/- व अधिक फॉर्म फी र.रु.२००/- असे एकूण र.रु.३०,२००/- (अक्षरी र.रु.तीस हजार दोनशे फक्त) त्यांचेकडे जमा करणेत मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २९) **३** जी वायरलेस डोंगल सुविधा वरीष्ठ अधिकारी, विभागप्रमुख, अभियंते व विविध कार्यालये यांना पुरविणेस तसेच यापुढे मागणीप्रमाणे सदरची डोंगल सुविधा पुरविणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३०) मा.क्रीडा समिती सभा ठराव क्र.१०१ दि.२१/०५/२०१५ नुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता १४३ विद्यार्थी खेळाडूंना खालीलप्रमाणे एकूण र.रु.५,१७,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख सतरा हजार फक्त) इतकी शिष्यवृत्ती रक्कम अदा करावी लागणार आहे.

| पात्र / अपात्र | राज्यस्तर | आंतरविद्यापीठ | राष्ट्रीयस्तर | एकूण |
|---|---|---|---|---|
| पात्र | ९० | ९ | ४४ | १४३ |
| अपात्र | ४४ | - | ९ | ५३ |
| एकूण | १३४ | ९ | ५३ | १९६ |

| **अ.क्र.** | **स्पर्धेचा स्तर** | **प्रत्येकी शिष्यवृत्ती र.रु.** | **एकूण खेळाडू** | **एकूण शिष्यवृत्ती र.रु.** |
|---|---|---|---|---|
| **१** | **राज्यस्तर** | **३,०००/-** | **९०** | **२,७०,०००/-** |
| **२** | **आंतरविद्यापीठ** | **३,०००/-** | **९** | **२७,०००/-** |
| **३** | **राष्ट्रीयस्तर** | **५,०००/-** | **४४** | **२,२०,०००/-** |
| | | **एकूण -** | **१४३** | **५,१७,०००/-** |

सबब म.न.पा.परिसरातील शालेय १४३ पात्र विद्यार्थी खेळाडूंना सन २०१३-१४ ची क्रीडा शिष्यवृत्ती र.रु.५,१७,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख सतरा हजार फक्त) अदा करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३१) मा.क्रीडा समिती सभा ठराव क्र.१०२ दि.२१/०५/२०१५ नुसार सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात नोंदणीकृत सार्व.संस्था / मंडळे यांचेकडून प्राप्त झालेल्या अर्जापैकी पात्र झालेल्या संस्थांना १) साई संस्कार संस्था, आकुर्डी, पुणे र.रु.२,९०,०००/- २) चैतन्य महिला मंडळ, भोसरी र.रु.२,९०,०००/- ३) शारदा महिला बालविकास शिक्षण प्रसारक मंडळ, पिंपळे गुरव, पुणे र.रु.१,४७,२२२/- ४) साई मित्रमंडळ, शाहूनगर,चिंचवड र.रु.२,९०,०००/- ५) ममता शिक्षण ट्रस्ट, म्हेत्रेवस्ती, चिखली र.रु.९८,४४३/- व ६) माई बालभवन, मामुर्डी, पुणे र.रु.१,३२,४२६/- या प्रमाणे एकूण र.रु.१२,४८,०९१/- (अक्षरी र.रु.बारा लाख अठ्ठेचाळीस हजार एक्याण्णव फक्त) अनुदान अदा केले असल्याने त्याचे अवलोकन होऊन त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३२) मा.क्रीडा समिती सभा ठराव क्र.१०३ दि.२१/०५/२०१५ नुसार महापालिकेचे क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्र.१८ प्रमाणे आंतराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे कु.वैष्णवी आनंदराव आंद्रे हिची बँकॉक थायलँड येथे दिनांक १९/०६/२०१५ ते २१/०६/२०१५ रोजी होणा-या इंटरनॅशनल योगासन ५ व्या योगासन स्पोर्टस् चॅम्पियनशिपकरीता योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.४१,२५०/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस हजार दोनश पन्नास फक्त) कु.वैष्णवी आनंदराव आंद्रे हिस आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३३) मा.क्रीडा समिती सभा ठराव क्र.१०४ दि.२१/०५/२०१५ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व महाराष्ट्र राज्य रोलबॉल असोशिएशन यांच्या मान्यतेने, पिंपरी चिंचवड शहर रोलबॉल असोशिएशन तसेच प्रबोधनकार विकास क्रीडा संस्था, यमुनानगर यांच्या संयुक्त विद्यमाने माहे मे/जून २०१५ मध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानावरील स्केटींग रिंग यमुनानगर, निगडी येथे महापौर चषक राज्यस्तर रोलबॉल स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.६,७५,७२८/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता तसेच स्पर्धा अनुषंगाने एकूण खर्च र.रु.६,७५,७२८/- मधील मैदान तयार करणे, स्टेज, मंडप, टेबल, खर्च्या व्यवस्था खर्च, खेळाडू निवास व्यवस्था, गाद्या, उशा, बेडशिटस्, चादर, बादली, मग इ. भाडे खर्च एकूण र.रु.१,४८,०००/- हा स्थापत्य विषयक खर्च स्थापत्य विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.४०,०००/- हा विद्युत विषयक खर्च, विद्युत विभाग संबंधित क्षेत्रीय कर्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च र.रु.४,८७,७२८/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३४) मा.क्रीडा समिती सभा ठराव क्र.१०५ दि.२१/०५/२०१५ नुसार मा.नगरसदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मा.नगरसदस्य, पुणे महानगरपालिका यांचा क्रिकेट सामना माहे मे/जून २०१५ मध्ये आयोजित करणेस व सदर सामना अनुषंगाने १६ टी शर्ट, पँट, बुट खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेकामी अंदाजे र.रु.६०,०००/- व दोन्ही संघातील नगरसदस्यांकरिता अल्पोपहार व भोजन व्यवस्था

करणेकामी अंदाजे र.रु.४०,०००/- असा अंदाजे एकूण र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३५) झोनिपु स्थापत्य विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/१७-२०१४-२०१५ मधील क्र.१३ अन्वये प्रभाग क्र.२८, ४२, ४३ व ५६ मधील झोपडपट्टयांमध्ये मनपा इमारत सांस्कृतिक इमारतीची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.एम.बी.कन्स्ट्रक्शन नि.र.रु. १३,९५,४३७/- (अक्षरी र.रु.तेरा लाख पंच्याण्णव हजार चारशे सदतीस फक्त) पेक्षा ४३.१०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.७,९४,००४/- पर्यंत काम करुन बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनमा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक- नस/४/कावि/४११/२०१५
दिनांक - २२/०५/२०१५

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.